# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०९/२०१७

## १) ट्रेलरच्या धडकेत शिक्षकाचा मृत्यु. :–

दिनांक १०/०९/२०१७ चे ०७.५० वा. दर. यातील मृतक श्रीहरी तुलाराम अतकरी वय ५२ वर्ष रा. मकरधोकडा धंदा – शिक्षक हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ३२ ०७ ने लाखनी कडुन भंडारा कडे येत असतांनी, यातील अज्ञात आरोपी ट्रेलर भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतकचे मोटार सायकल मागेहुन धडक दिल्याने मृतक हा जागीच मरण पावल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी नरेश तुलाराम अतकरी वय ४५ वर्ष रा. मकरधोकडा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लांडे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

## २) मोटार सायकलच्या धडकेत पायी मुलगी जखमी झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०९/०९/२०१७ चे १५.३० वा. दर. यातील आरोपी चालकानी त्याचे ताब्यातील डिस्कव्हर मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीची मुलगी कुमारी रिजा वय ०८ वर्ष, ही गावातील रोडने पायी जात असता तिला मोटार सायकलने धडक मारुन जखमी केल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी सौ. अनु वनवास पारधी वय ४२ वर्ष, रा. मिटेवानी यांचे तोंडी रिपोर्ट व जखमीचे एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३७७ भांदवि. सहकलम १८४,१३४ अ,ब /१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावने पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

## ३) मोटार सायकल हयगयीने चालवुन स्वत: व मागे बसणाऱ्या मुलीस जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १०/०९/२०१७ चे १३.०० ते १३.३० वा. दर. यातील एसटी बस क्र. एमएच ०७ सी ९४४६ चा चालक दिलीप राघोर्ते हा तुमसर ते मुंढरी येथे प्रवासी घेवुन जात असता तुमसर ते देव्हाडी रोडवर अग्रवाल कॉलेज समोर विरुध्द दिशने देव्हाडी कडुन येणाऱ्या आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने, लापरवाहीने चालवुन शाळेच्या बसला ओव्हरटेक करुन उभ्या असलेल्या एसटी बसला समोरुन कट मारल्याने मोटार सायकल चालक व मागे बसणारी मुलगी कुमारी लिमानी बन्सोड वय १८ वर्ष, रा. देव्हाडी हिला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे पोउपनी. हावरे यांचे चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३७७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा सरोदे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

## ४) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक १०/०९/२०१७ चे ०९.१५ ते ०९.४५ वा दर. यातील फिर्यादी दिनेश लालचंद लालवानी वय २५ वर्ष, रा. गोवर्धन नगर तुमसर यानी आपली मोटार सायकल होंडा साइन क्र. एमएच ३६ व्ही १५७६ ही हॅन्डल लॉक न करता गणेश मंदीर गंज मार्केट जवळ ठेवुन जवळच्या दुकानात सामान खरेदी करण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. चिचखेडे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**५) सर्पदंशाने . औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :—**

दिनांक १०/०९/२०१७ चे ०४.४५ वा. दर यातील मृतक अनुसया मिंटु निखारे वय ६० वर्ष, रा. दिघोरी हिला साप चावल्याने व हायपर टेंशन या रोगाने असल्याने सा. रु. भडारा येथे दिनांक ०९/०९/२०१७ ला औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. सिंगनजुडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**६) नहराचे पुलीयाजवळ इसमाचे प्रेत मिळुन आले. . :—**

दिनांक १०/०९/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील मोहाडी खापा यातील अशोक माटे हा त्याचे शेतावरुन परत येत असतांना मोहाडी खापा येथील नहराचे पुलीयाजवळ मृतक योगेन्द्र रामदास बारागवने वय ३५ वर्ष, रा. कवलेवाडा हा मरण पावलाचे स्थितीत मिळुन आल्याने पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक ०६/०९/२०१७ चे १४.४५ वा. दर. यातील अनोळखी मृतक इसम वय अंदाजे ३० वर्ष, वयोगटातील याची प्रकृती गंभिर असल्याने तो औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती होता त्यास पुढील उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे रेफर केल्याने त्यास दिनांक ०६/०९/२०१७ ला वार्ड क्र. ९ मध्ये भरती केले असता १४.४५ वा. उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गरजे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खैरकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**९) अवैध दारू अडयावर धाडी . :—**

दिनांक १०/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा, भंडारा, जवाहरनगर, आंधळगाव, लाखनी, पालांदुर व पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून १९ लिटर हा. भ. दारू किंमती १४००/—रु. ३१७ लिटर ७०० मिली लिटर देशी दारु किंमती २,८१,७६८/—रु. असा एकुण किंमती २,८३१६८/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १०/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.